# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १४५ वा ❑ भारतीय सौर दिनांक २८ आषाढ शके १९४८, रविवार दि.१९ जुलै २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## मुलगी म्हणून जन्माला येणे पाप आहे का?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

मुलगी म्हणून जन्माला येणे पाप आहे का? अत्याचारांच्या घटनांवरून असेच वाटायला लागले आहे...दररोज वर्तमान पत्र उघडल्या नंतर सर्वात जास्त बातम्या स्त्रियांवरील व मुलींवरील अत्याचाराच्या बातम्या असतात..एक वर्षाच्या चिमुरडीपासून तर वृद्ध महिलांपर्यंत कोणीच सुरक्षित नाही. स्त्रियांच्या व मुलींच्या अत्याचाराच्या घटनांवरून मुलगी म्हणून, स्त्री म्हणून जन्माला येणे पाप आहे का,? हा प्रश्न सतत मनात घोंघावत असतो.

मुलगी म्हणून जन्माला येणे बिलकुल पाप नाही. समाजात घडणाऱ्या अत्याचारांच्या दुर्दैवी घटनांमुळे मनात अशी तीव्र वेदना, हताशपणा आणि संताप निर्माण होणे अगदी साहजिक आहे.दोष मुलीचा नसून पुरुषी विकृत मानसिकतेचा व ईथल्या व्यवस्थेचा आहे.एखाद्या मुलीवर अन्याय होतो,म्हणून तिचा तो दोष नसून दोष तर महिलांवर अत्याचार करणाऱ्या विकृत मानसिकतेमध्ये आहे.मुलगी म्हणून जन्माला येणे हे अजिबात पाप नाही. मुलगी हा निसर्गाचा एक सुंदर आशीर्वाद आहे. स्त्री आणि पुरुष या दोन्ही मानवी जीवनाचे समान भाग आहेत.

वर्धा जिल्ह्यातून एक मन हेलावून टाकणारी आणि कायदा–सुव्यवस्थेच्या चिंधड्या उडवणारी घटना समोर आली आहे. सावंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात १२ वर्षीय अल्पवयीन मुलीची अत्यंत अमानुषपणे दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आली. पीडितेचा मृतदेह निर्जन स्थळी विवस्त्र अवस्थेत आढळून आल्याने, नराधमाने तिच्यावर पाशवी अत्याचार करून ओळख पटू नये म्हणून तिची हत्या केली. या क्रूर घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून वर्धा जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

मृत मुलगी ही अत्यंत गरीब कुटुंबातील असून तिचे आई–वडील शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. नेहमीप्रमाणे संध्याकाळी शेतातील घरात किंवा निर्जन ठिकाणी या चिमुरडीचा मृतदेह काही स्थानिकांना आढळून आला. मृतदेहाची अवस्था अत्यंत भयानक होती; तिच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर मोठ्या दगडाने अनेक वार करण्यात आले होते, ज्यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला.काय दोष होता या चिमुरडीचा.मुलगी म्हणून जन्माला आली हाच तिचा दोष होता का? शिक्षण घेण्याच्या व खेळण्याच्या वयात तिच्यावर अत्याचार करून दगडाने ठेचून मारल्या गेले.विशेष म्हणजे हे निर्दयी कृत्य करणारा तिच्या व घरच्यांच्या ओळखीचा होता,पाणी पिण्याच्या बहाण्याने तो घरात घुसला,एकटी दिसताच त्याची वाईट नजर तिच्यावर गेली,बळजबरी करून शेवटी तिची हत्या करून टाकली.दोष त्या चिमुरडीचा होता का?

गुन्हा स्त्री असण्यात नाही, तर गुन्हेगारी मानसिकतेमध्ये आहे. मुलगी असणे हे पवित्र आणि निसर्गाचे सुंदर चक्र आहे. आदर न करण्याची समाजातील काहींची विकृत वृत्ती याला कारणीभूत आहे.

मुलगी जन्माला येणे पाप नसून ती सृष्टीचा आधार आहे. स्त्री ही या जगाची आणि मानवी संस्कृतीची निर्मिती करणारी शक्ती आहे.असुरक्षिततेसाठी मुली जबाबदार नसून, त्यांना सुरक्षित वातावरण न देऊ शकणारी व्यवस्था आणि समाज कारणीभूत आहे.

आज मुली प्रत्येक क्षेत्रात देशाचे नाव उंचवत आहेत. अन्यायाविरुद्ध समाज आणि अनेक संस्था आता मोठ्या संख्येने आवाज उठवत आहेत. मुलगी ही घराची आणि समाजाची शान आहे, ती कधीही ओझे किंवा पाप असू शकत नाही.प्रत्येक मुलीला भयमुक्त जगता येईल अशी यंत्रणा हवी,अशी व्यवस्था निर्माण करण्यात समाज व प्रशासकीय यंत्रणा कुठेतरी कमी पडत . स्त्री अत्याचार आणि उद्योग कायदे असूनही त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात फोफावत आहे.

मुलगी म्हणून जन्माला येणे हे अजिबात पाप नाही. उलटपक्षी, ते एक वरदान आणि आशीर्वाद आहे. मुलगा किंवा मुलगी असणे हा निसर्गाचा नियम आहे. स्त्री ही कुटुंबाचा व समाजाचा मुख्य आधारस्तंभ असते. मुलींना लक्ष्मी मानले जाते.अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. गुन्हेगारांमध्ये कायद्याची धाक निर्माण करणे गरजेचे आहे. आपल्या देशात गुन्हेगारांना शिक्षा मिळण्यासाठी विविध कायदे आहेत.कायद्याची अंमलबजावणी करण्याची व शिक्षा करण्याची गरज आहे.

# ‘मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी’ सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट

### ७२ वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर; ‘मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी’ सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट
### कार्तिक आर्यन आणि मामुट्टी सर्वोत्कृष्ट अभिनेता तर यामी गौतम सर्वोत्कृष्ट अभिनेत्री, आर्टिकल ३७० सर्वोत्कृष्ट चित्रपट

ज्योतिर्मय साहित्य

नवी दिल्ली : मराठी रंगभूमीवर गाजलेल्या ‘मु. पो. बोंबिलवाडी’ या नाटकाचे चित्रपटरूप असलेल्या दिग्दर्शक परेश मोकाशी यांच्या ‘मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी’ या चित्रपटाने यंदाच्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार पटकावला. तर सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार ‘आर्टिकल ३७० ‘ ला जाहीर झाला आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठेचे मानले जाणारे ७२ वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (२०२४) आज केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाने जाहीर केले. यंदाच्या पुरस्कारांमध्ये मराठी चित्रपटसृष्टीने फीचर आणि नॉन–फीचर या दोन्ही विभागांत उल्लेखनीय कामगिरी करत विविध मानाचे पुरस्कार आपल्या नावे केले. त्याचबरोबर हिंदी आणि प्रादेशिक भाषांमधील चित्रपटसृष्टीतील कलाकारांनीही अभिनय, दिग्दर्शन आणि तांत्रिक क्षेत्रातील प्रमुख पुरस्कार पटकावले.

फीचर फिल्म्स विभागात विवेक फिल्म्स आणि मयसभा करमणूक मंडळी एलएलपी निर्मित ‘मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी’ या चित्रपटाची सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट म्हणून निवड करण्यात आली. प्रभावी कथानक, उत्कृष्ट मांडणी आणि संवेदनशील दिग्दर्शनामुळे या चित्रपटाने राष्ट्रीय परीक्षकांची पसंती मिळवली. दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण महाराष्ट्रातील विनोदी आणि उपरोधिक कथानक प्रभावीपणे मांडणाऱ्या या चित्रपटाला राष्ट्रीय परीक्षकांनी सर्वोच्च पसंती दिली.




मराठी चित्रपटसृष्टीला संगीत आणि लेखन क्षेत्रातही राष्ट्रीय स्तरावर मोठा गौरव मिळाला. ‘घरत गणपती’ चित्रपटातील ‘नवसाची गौरी माझी’ या गीतासाठी गायक अभय जोधपूरकर यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. तसेच ‘स्वरगंधर्व सुधीर फडके’ या चरित्रपटासाठी योगेश देशपांडे यांना सर्वोत्कृष्ट रुपांतरित पटकथा या श्रेणीतील राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला.

अभिनय क्षेत्रातील प्रमुख पुरस्कारांमध्ये ‘चंदू चॅम्पियन’ चित्रपटासाठी कार्तिक आर्यन आणि ‘ब्रॅमायुगम’ चित्रपटासाठी मामुटी यांना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेता हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. ‘आर्टिकल ३७०’ या चित्रपटातील प्रभावी अभिनयासाठी यामी गौतम यांची सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून निवड जाहीर झाली. याच चित्रपटाला सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म पुरस्कारही जाहीर झाला. आदित्य जांभळे यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे.

याशिवाय, ‘भक्षक’ चित्रपटासाठी संजय मिश्रा यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. ‘श्रीकांत’ या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट पुरस्कार जाहीर झाला, तर रणदीप हुड्डा यांना ‘स्वातंत्र्यवीर सावरकर’ या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट पदार्पण करणारा दिग्दर्शक हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला.

नॉन–फीचर विभागातही मराठी चित्रपटांनी आपला ठसा उमटवला. ‘भंगार (ओबसोलेट )’ या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट नॉन–फीचर फिल्म हा सर्वोच्च सन्मान जाहीर झाला. ‘हमसफर’ या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट लघुचित्रपट पुरस्कार जाहीर झाला.

‘परत ४१ च्या मागावर (ऑन द ट्रेल ऑफ ४१)’ या चित्रपटासाठी शिवपाल सिंग कांग यांना सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शन पुरस्कार जाहीर झाला. तसेच ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी एकता का प्रतीक’ या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन पुरस्कार जाहीर झाला.

यंदाच्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये मराठी चित्रपट, कलाकार, लेखक, संगीतकार आणि तंत्रज्ञांनी विविध श्रेणींमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून राष्ट्रीय स्तरावर मराठी चित्रपटसृष्टीची समृद्ध परंपरा, आशयघनता आणि दर्जेदार चित्रनिर्मिती पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

# डॉक्टर गणेश महाजन एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व

ज्योतिर्मय साहित्य

अजिंठा या दैनिकात रत्नाकर पंडित यांच्या समवेत काम करत असताना कधी कधी वृत्तपत्राच्या कामाच्या निमित्ताने आम्हाला बँकेत जावे लागायचे त्यावेळी युको बँकेची शाखा औरंगपुरा येथे होती. तेव्हापासून गणेश महाजन यांची ओळख झाली ती शालिवाहन प्रभात शाखेच्या निमित्ताने पुन्हा एकदा ताजी तवानी झाली.

गेल्या चार–पाच वर्षापासून श्री गणेश महाजन हे सातत्याने रुग्णसेवा मंडळाचे काम करत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याला शालिवाहन प्रभात मधील अनेक स्वयंसेवकांची साथ असते. मुंबई सीएसटी चे जनरल मॅनेजर असलेले सेवानिवृत्त श्री विजय जोग हे सिडको भागात रहावयास आले. विजय जोग,गणेश महाजन आणि डॉक्टर श्याम कुडे आणि मी असा एक चौकोन तयार झाला. आम्ही शालिवाहन प्रभात शाखेमध्ये गेली पाच–सहा वर्षे सातत्याने उपस्थित राहू लागलो. विजय जोग यांना तर सार्वजनिक कार्यक्रमाची खूपच आवड. संगीताची मैफल असो एखादे व्याख्यान असो की मनोरंजन



पर कार्यक्रम कुठल्याही कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी ते उत्साहाने तयार होतात.

अशावेळी गणेश महाजन आणि डॉक्टर श्याम कुडे यांची हजेरी असतेच. सेवानिवृत्तीनंतर ज्येष्ठ नागरिकांना विविध सामाजिक कार्यात रुची घ्यायला आवडते असे समाज कार्य करताना तन, मन, धन सर्वस्वाचे समर्पण करून जेव्हा एखादा समूह उभा राहतो तेव्हा त्यातून अनेक चांगल्या गोष्टी घडतात.

कधी त्यामुळे माऊलीला मदत होते तर कधी रवींद्र शिंदे स्वच्छता दूत म्हणून त्याचा सत्कार केला जातो.

विजय जोग यांनी विवेकानंद विचार मंच आणि शालिवाहन संशोधन मंडळ यांचे संघटन उत्तम प्रकारे केले आहे आता विवेकानंद विचार मंचाचा तिसरा वाढदिवस नोव्हेंबर महिन्यात साजरा होत आहे शालिवाहन प्रभात चे हेमंत धर्माधिकारी तसेच रमाकांत जगत आणि आता नव्याने कार्यवाह झालेले उत्साहाचा अखंड निर्झर असे ज्यांचे वर्णन करता येईल निवृत्त अधिकारी शिवशंकर गुंडे यांनी तर शालीवाहन प्रभात मध्ये नवचैतन्य आणले आहे.


शाखेचा परिसर रोज स्वच्छ करणारे गोरख शिरसे हे कन्नडचे जुने स्वयंसेवक संघाच्या कार्यालयात राहून शिकले. नव्याने रुजू झालेले तुपे सर ध्वजाभोवती फुलांची रिंगण एवढे छान करतात की त्याकडे पाहतच राहावे असे वाटते.

गणेश महाजन शालिवाहन शाखेचे भूषण आहेत. त्यांच्या स्वभावाचा सुगंध आणि परिमळ शाखेच्या वटवृक्षाखाली दरवळत असतो.

आता श्यामसुंदर कुडे असत की विजय जोग गोरक्षर शीरसे, रमाकांत जगत सारेच त्यांच्यावर प्रेम करतात आणि त्यांच्यावर जी जबाबदारी टाकली जाते ते ती निष्ठेने पार पाडतात..

गणेश महाजन यांच्या कर्तृत्वाची किनार अशी की ते सुखदुःखाच्या कुठल्याही प्रसंगी लगेच धावून जातात.

सेवा मंडळाचे कार्य असो की उजळंबकर वाचनालयातील उपक्रम असो, संदेश पोहोचला की महाजन हजर. ज्येष्ठ नागरिक संघटनेमधील विविध उपक्रम व कार्यक्रम यामध्येही




ते सदैव आघाडीवर असतात.

शाखेचा गुरुपौर्णिमा उत्सव असो की मकर संक्रमण उत्सव असो महाजन स्वतः होऊन पुढाकार घेतात आणि या उत्सवाच्या यशासाठी झटतात.

त्यांना श्रेय नको असते त्यांना लोकांनी चांगले म्हणावे अशी भावनाही नसते.

चांगले काम होत आहे ना मग त्याला आपला हात लागला तर काय बिघडले अशी त्यांची भावना असते.

एक मित्र एक सच्चा स्वयंसेवक आणि निरलस जेष्ठ नागरिक या नात्याने त्यांचे कार्य सदैव माणसे जोडण्याचे आहे.

ते कधीही निराश होत नाहीत कधीही पराभूत अवस्थेत जगत नाहीत सदैव हसरा चेहरा आणि प्रसन्न व्यक्तिमत्व यामुळे गणेश महाजन सर्वांचे मित्र झाले आहेत अशा या आजाद शत्रू आणि सर्वसमावेशक मित्रास उदंड आयुष्य लाभो.

त्यांच्या बँकेतील प्रेमाची ठेव कधीच संपत नाही ती सतत दुप्पट होत राहते यातच त्यांचे खरे मोठेपण आहे. मातृ ऋण पितृऋण लौकी करून यापेक्षाही समान अधिक श्रेष्ठ मानणाऱ्या संघ संस्कारातून घडलेल्या आमच्या या मित्रास सर्वांचा प्रणाम असो ईश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो नागरिक देवो भव हाच त्यांच्या यशाचा मंत्र आहे.


ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
Sanjay Vyapari
Scan to pay with any UPI app

## नवोदित साहित्यिकांसाठी सुवर्णसंधी

ज्योतिर्मय साहित्य महाराष्ट्रातील सर्व नवोदित लेखकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ म्हणून पुढे येत आहे. फक्त साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील एकमेव ई-दैनिक ज्योतिर्मय साहित्य हे आहे.

मागील दीड वर्षात या व्यासपीठावरून साधारण 150 + साहित्यिक तयार झाले आहेत आणि ही संख्या दररोज वाढत आहे.

नवोदित साहित्यिक या व्यासपीठावरून बिनधास्त लेखन करू शकतो कारण त्यांना योग्य मार्गदर्शन करणारी टीम येथे आहे. याचा अनुभव मागील वर्षात अनेक साहित्यिकांनी घेतला आहे. त्यांचे साहित्य या व्यासपीठावरून त्यांचा फोटो व मोबाईल क्रमांकासह देण्यात येते. त्यामुळे वाचक त्यांच्याशी थेट संपर्क करू शकतो.

ज्योतिर्मय च्या व्यासपीठावरून कोणीही आपले विचार मांडू शकतो, त्यांच्यासाठी अट फक्त एकच आहे. त्यांना रुपये पाचशे भरून वार्षिक सदस्यता घ्यावी लागते, नंतर ते वर्षात संपूर्ण 365 दिवस या व्यासपीठाचा वापर करू शकतात.

मित्रांनो मग वाट कसली बघता लगेच ज्योतिर्मय साहित्य चे मेंबर व्हा व लिहिण्यास सुरुवात करा, तुमचे उज्वल भवितव्य लवकरच येथे घडणार आहे.

@ संजय व्यापारी,
संपादक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे
वार्षिक वर्गणी 7743918559 या नंबरवर किंवा दिलेल्या QR Code वर ऑनलाईन पाठवा. व पैसे भरल्याचा स्क्रिनशॉट पाठवा.




## जात्यावरच्या ओव्या......

एका मायचे लेकर
कसे झालेत दुर दुर?
माऊलीच्या पोटी
तुटे आतड्याचे सुर|| ७५०||

पंढरीचा पांडुरंग
आहे विटेवर उभा
भरल्या डोळ्यान
पाहे वारकरी सभा ||७५१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५३



ज्योतिर्मय 📖 साहित्य

''सत्यम बृयात, प्रियम बृयात.'' गोडही बोलायचे आणि सत्यही बोलायचे ही तारेवरची कसरत असते. परंतु दुसऱ्याला न दुखवता देखील सत्य सांगता येते. असा भक्त समर्थांनी सांगितल्याप्रमाणे सदा सर्वदा म्हणजे नेहमी सत्य बोलतो. परंतु या सत्य बोलण्यात विवेकाचा वापर तो करतो. एखाद्या अत्यवस्थ किंवा शेवटच्या घटका मोजत असणाऱ्या रुग्णाला जर आपण भेटायला गेलो आणि त्याला म्हटले की आता ही तुझी शेवटची अवस्था आहे. त्यातून तू बरा होणार नाहीस. असे बोलणे सत्य जरी असले तरी ते अविवेकाचे आहे. म्हणून अशा वेळी विवेकाचा वापर करून, '' तू बरा होणार आहेस. तुला लवकरच बरे वाटेल. '' अशा प्रकारचा धीर देणे उपयुक्त ठरते.

खोटे बोलणे आणि स्वतःच्या असत्य वागण्याचे लटके समर्थन करीत राहणे ही सवय बऱ्याच लोकांना असते. परंतु काही काळानंतर लोकांना अशा माणसांचा स्वभाव लक्षात येतो आणि मग त्यांच्या बोलण्यावर ते फारसा विश्वास ठेवत नाहीत. ते बोलतात एक करतात दुसरे आणि वागतात तिसऱ्या प्रकारचे. अशा वागणाऱ्यांसाठी समर्थांनी त्रिवाचा हा शब्द वापरला आहे. म्हणजे ज्यांच्या वागण्याबोलण्यात एकवाक्यता नसते अशा व्यक्ती. परमेश्वराचा खरा भक्त कधीही असत्य बोलून आपली जीभ विटाळत नाही. त्याला खोटे बोलण्याची गरजही भासत नाही. कारण त्याला काही लपवायचे नसते. खोटे ते बोलणाऱ्या माणसाला आपल्या बोलण्याची वेगवेगळी कारणे सांगावी लागतात. आणि आपण आधी काय बोललो होतो हे लक्षात ठेवावे लागते. भक्त हा निर्मळ मनाचा आणि सरळ स्वभावाचा असतो. त्यामुळे त्याच्या वागण्या बोलण्यात एकवाक्यता असते. त्यामुळे तो जे बोलतो ते सत्यच असते. त्याचे शब्द त्याच्या निर्व्याज आणि निरलस व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असतात.

आणि ज्याच्या शब्दांत सत्य, नम्रता आणि विवेक असतो, तोच खरा ''सर्वोत्तमाचा दास'' ठरतो.

स्वसंवाद :


१) माझ्या बोलण्यात नम्रता आणि माधुर्य आहे का?

२) ''स्पष्ट बोलतो'' या नावाखाली मी कधी दुसऱ्याला दुखावतो का?

३) सत्य बोलताना मी विवेकाचा वापर करतो का?

४) माझे विचार, बोलणे आणि वागणे यात सुसंगती आहे का? **(क्रमशः)**

### उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२





## || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

**जोडीदार**

**जोडीदार म्हणजे आपल्याला साथ देणारी व्यक्ती मग ती कोणीही असू शकते, मित्र, नातेवाईक, आपला मदतनीस ज्याला आपल्याबद्दल मनापासून आस्था असते तो खरा जोडीदार समजावा.**

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## गुरुसेवा करणे म्हणजे काय?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय 📖 साहित्य

साधनाची आटाआटी कुठपर्यंत करायची ? जप, तप, नेम, याग, वगैरे आपण कशाकरिता करतो ? तर देवाची प्राप्ति व्हावी म्हणून. तोच देव जर आपल्या घरी आला, तर साधनाची आटाआटी कशाला करायची ? म्हणून, साधनाची आटाआटी करण्याचे कारण नाही; नाहीतर त्याचाच अभिमान होतो, आणि मिळवावयाचे ते बाजूलाच राहून उलट तोटा होतो. जे जे घडत असते ते माझ्या इच्छेने झाले असे समजत जा आणि त्यात आनंद माना. तुम्ही जी जी गोष्ट कराल त्यात मला आठवा. गुरुभक्ति करायची म्हणजे काय ? त्याच्या देहाची सेवा करणे हीच गुरूची सेवा असे तुम्हाला वाटते का ? त्याच्या देहाची सेवा करणे ही गुरूची खरी सेवाच होत नसते. गुरू सांगेल तसे वागणे, हीच त्याची खरी सेवा होय. माझ्याजवळ जे येतात, ते कुणी मुलगा मागतो, कुणी संपत्ती मागतो, कुणी रोग बरा व्हावा म्हणून मागतो; तेव्हां माझी सेवा करायला तुम्ही येता, का मीच तुमची सेवा करावी म्हणून येता ? माझ्याजवळ येऊन, मनुष्यदेहाचे खरे सार्थक होईल असे करा. तुम्ही मागाल त्याप्रमाणे मी थोडेसे देणार नाही असे नाही; पण ते काढा घेण्याकरिता गुळाचा खडा देण्यासारखे आहे.

मला सर्व कळते असे माझ्याबद्दल तुम्ही म्हणता, पण ते मनापासून नव्हेच. कारण ज्याला असे खरोखर वाटत असेल त्याच्या हातून पापकर्म होणारच नाही. ज्याची वृत्ती माझ्याशी एकरूप होईल त्यालाच कळेल की, मला सर्व कळते आहे. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजे इतके की, त्याचे मन आणि आपले मन एकच झाले पाहिजे. म्हणजे दैववशात जरी आपण गुरूपासून दूर असलो तरी मनाने त्याच्याशी संलग्न असल्यावर त्याच्यापाशीच असू. आपण आपल्या आईशी जसे बोलतो तसे माझ्यापाशी बोलावे, आपले सर्व दुःख मला सांगत जावे. तुम्ही इतके कष्ट घेऊन मला भेटायला येता, पण तुम्हाला रिकामे परत जाताना पाहून मला फार वाईट वाटते. माझ्याजवळ जे आहे ते व्यावहारिक जगात कुठेही तुम्हांला मिळायचे नाही; ते म्हणजे भगवंताच्या नामाचे प्रेम होय. सगळ्या प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे. ज्याला मी भेटावा असे वाटते, जो माझा म्हणवितो, त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे.

नामावर प्रेम करणे म्हणजेच माझ्यावर प्रेम करणे.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### आपले सण,आपलेउत्सव वट सावित्री पोर्णिमा

पुढे.....
पतिव्रता पतीव्रता म्हणजे साधन तप करत असताना पतीशी एकनिष्ठ राहून आपले तप पूर्ण करीत राहणे. स्कंद पुराणांमध्ये पती सेवेचे महत्त्व खालील प्रमाणे दिले आहे.

पती सेवा परो धर्म: स्त्रीणां धर्म सनातन:/
पतौ तुष्टे जगत्तुष्टं पतौ सष्टे कुत:सुखम/
पद्मपुराणात असे आले आहे .
कार्येषु दासी करणेषु मंत्री/
रुपेच लक्ष्मी क्षमया धरित्री /
भोज्येषु माता शयनेशु रंभा/
षटकर्मयुक्ता कुलधर्म पत्नी//

■ वडाची पुजा का करतात?
ज्या झाडाखाली सत्यवानाचे प्राण गेले व परत मिळाले, ते झाड वडाचे होते म्हणूनही त्याचे महत्त्व आहे. वड हा दीर्घायुष्य देणारा, अखंड जीवन स्थैर्य, संतती व पतीचे आयुष्य याचे प्रतीक मानला जातो.

*वटोही विष्णुरूपोयं सावित्री
ब्रह्मरूपिणी सत्यवान रुद्र रूपश्च वटमुले
प्रतिष्ठित:

वटवृक्ष हा विष्णूचे स्वरूप आहे. सावित्री ब्रह्मस्वरूप आहे. तर सत्यवान रुद्र स्वरूप मानला जातो. यामुळे वटवृक्षा भोवती प्रदक्षिणा म्हणजे, संसार चक्रातील अखंड मंगलतेची प्रार्थना असे मानले जाते. (क्रमश)

## सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### रोजचा व्यायाम व हास्य साठीनंतरचे टॉनीक

साठीनंतर माणूस खरे तर वृद्ध होतो. काही आजार व्याधी असेल तर रोजचा दिनक्रम, कामे, बोलणे, उठणे बसणे यात फरक पडतो. तसेच परिस्थिती जबाबदारी नाही म्हटलं तरी परिणाम करतातच. खाऊनपिऊन सुखी असले तरी शरिराचे अवयव व स्टॅमिना टिकण्यासाठी हासू व्यायाम याने तरतरी राहते. तुम्ही एकटे असाल व कारणाशिवाय हास्यनाटक केले तरीही शरीरात'हॅपीहार्मोन्स' चीच निर्मिती होते. ग्रुपमधे एकत्र हसणे तर खूपच प्रभावी असून एकटेपणा दूर होतो. मनमोकळेपणाने हसण्याने वाढत्या वयात मानसिक, शारीरिक, आरोग्य टिकवून ठेवते. या वयातील तणाव कमी होऊन स्मरणशक्ती सुधारते. हसणे संसर्गाशी लढण्याची क्षमता वाढते. हलकासा व्यायाम व हास्य फुफ्फुसक्षमता, दमा व श्वसनाचा त्रास मर्यादित होतो. म्हणून बागेत, घरी मिळून हास्य करावे. वेळ काढावा, रोज हातापायाची हालचाल व हास्य कॅलरी बर्न करते. शांत झोप लागते हे संशोधन सांगते."अजून खूप करायचे बाकी आहे." या भ्रमातून बाहेर पडायला हवे. जसे ऊन्हात बसून गप्पा मारणे यात आनंद. म्हणून जेष्ठानो पुढच्या क्षणाची चिंता सोडून चालू क्षणात आनंदी रहा.. स्वस्थ रहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग वाचत रहा गूड डे व्हेरी गूड मार्निंग आणि ईथे थांबतो. आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.



## 'मध' अनेक समस्यांना दूर ठेवण्यासाठी फायदेशीर

ज्योतिर्मय 📖 साहित्य

मध खनिजे, जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांचा संग्रह आहे. रोगप्रतिकार शक्ती बळकट करण्याव्यतिरिक्त, मध अनेक प्रकारच्या समस्या दूर करण्यात देखील प्रभावी आहे.

आजच्या काळात प्रत्येकाने आपल्या आरोग्याबाबत सतर्क होण्याची गरज आहे. विशेषतः प्रत्येकाला आपली प्रतिकारशक्ती बळकट करण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत आपल्यासाठी मधाचे सेवन करणे फायदेशीर ठरू शकते. मध खनिजे, जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांचा संग्रह आहे. रोगप्रतिकार शक्ती बळकट करण्याव्यतिरिक्त, मध अनेक प्रकारच्या समस्या दूर करण्यात देखील प्रभावी आहे. आयुर्वेदात याचा उपयोग सर्व रोग बरे करण्यासाठी केला जातो. चला तर, जाणून घेऊया मधातील या औषधी फायद्यांविषयी अधिक माहिती...

मधापासून घरगुती उपचार :

खोकल्याचा त्रास बराच काळ बरा होत नसेल, तर मधाचे सेवन करणे खूप उपयुक्त ठरू शकते. मधात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे गुणधर्म असतात, जे संसर्ग रोखतात. तसेच, मध कफ सहजपणे काढून टाकतो. आपण एखादा चमचा नुसता मधही खाऊ शकता. याशिवाय आल्याच्या रसामध्ये मध मिसळून खाल्याने कफ आणि खोकल्यात खूप आराम मिळतो.

वजन कमी करण्यासाठी देखील मध खूप उपयुक्त आहे. त्यात अजिबात चरबी नसते. याशिवाय मध कोलेस्टेरॉलची पातळी देखील नियंत्रित करतो. वजन कमी करण्यासाठी आपण कोमट पाण्यामध्ये मध मिसळून, ते पाणी सकाळी रिकाम्या पोटी पिऊ शकता.

घसा खवखवणे या समस्येतून आराम देण्यासाठी देखील मध फार प्रभावी आहे. जर, तुम्हाला घसा खवखवणे किंवा घसा दुखण्याची असेल, तर मध सेवन केल्यास खूप आराम मिळेल.

बद्धकोष्ठता हे बऱ्याच रोगांचे मूळ आहे. बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करण्यासाठी मधाचे सेवन खूप फायदेशीर ठरते. नियमित सेवन केल्यास पोटातील गॅस आणि अपचनापासूनही मोठा आराम मिळतो.

मधात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे आणि विरोधी दाहक गुणधर्म असतात. कोणत्याही ठिकाणी सूज किंवा वेदना असल्यास किंवा जखम झाली असल्यास थेट त्या जागी मध लावू शकता. यामुळे भरपूर आराम मिळेल.

जर तुमची त्वचा खूप कोरडी असेल, तर त्वचेमध्ये नैसर्गिक ओलावा येण्यासाठी मधाचा वापर केला जाऊ शकतो. यासाठी आपण केवळ मध चेहऱ्यावर फेसपॅक म्हणून वापरू शकता.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**रामभक्त**


रामभक्त म्हणून जगी
ओळख श्री हनूमंताची
एकमेव भक्त महान
हदयी विराजे त्यांच्या
राम-लक्ष्मण-सीता
पूजेचा आद्य मान

रामभक्तीत सदा तुझे
मन आनंदी असता
हृदयी श्रीराम वसतो
सर्वांगा सिंदूर लावून
जीवन आनंदी जगता
मुखी रामनाम गातो

# आत्महत्या का करता? गुरुभक्ती करा !

ज्योतिर्मय साहित्य

दुसऱ्याच्या चित्ताला आनंद देण्यासाठी च माणसाचा जन्म असतो. आपण वैतागून किंवा नैराश्यात जावून जर आत्महत्येचा मार्ग अवलंब करून देह संपविला तर आपल्याला कितपत आनंद मिळेल किंवा स्वर्ग सुख मिळेल हे सांगता येणार नाही किंवा आपल्यालाही त्याचा काही बोध होणे शक्य वाटत नाही. पण आपल्या विरहाने आपल्यावर अवलंबून असलेल्या रक्ताच्या नातेवाईकांचे, प्रेम करणाऱ्या माता पित्याचे, पत्नी मुला वर काय प्रसंग ओढवून येईल आणि त्यांना काय वेदना घेवून जगावे लागेल ह्याचा विचार करणे आवश्यक आहे. तेव्हा ह्याचा विचार आपण आत्महत्येचा अवलंब करण्यापूर्वी करणे अत्यंत गरजेचे आहे. आत्म जागृती करून घेणे गरजेचे आहे किंवा अशा गोंधळलेल्या मनःस्थिती मध्ये गुरुची मार्गदर्शक किल्ली वापरून गुरु आज्ञा घेणे गरजेचे वाटले पाहिजे. कोणताही सद्गुरू आत्महत्येला प्राधान्य देणारच नाही त्याविरुद्ध आपल्या गुरू उपदेशा मधून त्याला सुयोग्य मार्गाचा पथदर्शी उपाय सांगितल्या शिवाय किंवा त्याचे मत आत्महत्ते पासून परावर्तीत केल्या शिवाय राहणार नाही . पण संयमाने समजूतदारपणाने शिष्यानी आपल्या कृतीत उतरविले पाहिजे.




सद्गुरूना शरण गेले पाहिजे त्यांचा उपदेश शिरोधार्य मानला पाहिजे. तरच आपला आत्म उद्धार निश्चित असतो . ज्याप्रमाणे पायाळू व्यक्तीच्या डोळयात अंजन घातले असता त्याच्या दृष्टीस भूमिगत धनही दृष्टोत्पत्तीस येते असेम्हणतात किंवा चिंतामणी हाती लागल्यास साऱ्या मनोकामना पूर्णत्वास जातात तद्वतच गुरुकृपेने चांगले होत असते . पण त्यांच्या वर शिष्याचा दृड विश्वास असणे गरजेचे आहे. आत्महत्येचा विचार करणाऱ्याच्या भावना गुरुपदेशाने हरी रूप होतात म्हणजे पूर्णच होतात . पण त्यासाठी मना मध्ये दया, क्षमा. शांती, संयम, सकारात्मकता ठेवली पाहिजे . तसेच आपल्यावर अवलंबुन असलेल्या व्यक्तींबद्दल प्रेम, जिव्हाळा असला पाहिजे.

भारतीय संस्कृतीमध्ये गुरुशिष्य जपण्याची परंपरा आहे . गुरु हा शिष्या साठी दीपस्थंभ असतो . तो शिष्याला ज्ञान ज्योतीने उजळून काढीत असतो. सुकर आयुष्यासाठी मार्गदर्शक असतो. पण त्याच्या पर्यंत पोहचून शिष्या ने त्याच्या कसोटीवर उतरले पाहिजे. दृढ श्ध्येने गुरुने दिलेला हितोपदेशावर ज्ञानावर विश्वास ठेवला पाहिजे . आपल्या आयुष्याला वळण देण्यासाठी आपल्यात परिवर्तन होण्यासाठी वास्तविक गुरु मार्ग दर्शनाची जास्त गरज आहे.

गुरु फक्त मनुष्याला करता येतो.

✍️ आर. पी. दुसे
छ. संभाजी नगर 9422202747



पशु पक्षा ना नव्हे. त्याच मुळे त्यांच्या मध्ये निसर्गतः असलेल्या गुणांचा आनंद होत असतो आपण पहातो अनेक युगे आली अन् गेली मोर नाचताना, कोकिळे च्या गायनात त्यांच्यात काही बदल झाला नाही कारण त्यांना कोणी गुरु भेटलेला नाही किंवा सापडत नाही तसा निसर्ग नियमही नाही.

गुरु मात्र सद्गुरू असावा त्याचाही मापदंड ठरलेला असतो. तो परंपरेतील असावा त्याची विद्वत्ता, ज्ञान, बुद्धी प्रखर असावी, स्वतःप्रति आत्मबुद्धि असावी, भक्तांचे मन ओळखण्याची सर्वार्थानी किमया असावी. त्याग, निस्वार्थी वृत्ती, प्रेम, स्नेह पूर्ण वर्तणूक, आचार विचार जपणारा, अ स्पर्धात्मक, कोणाबद्दल राग द्वेश लोभ किंवा असूया नसणारा, संयमी, मनमिळावू, इद्रिये नियंत्रीत ठेवणारा, धाडसी, विनयी असावा.

अशाप्रकारचा गुरु जेव्हा शिष्याला मिळेल तेव्हा त्यांचा आदर करणारा शिष्य असावा. गुरुंच्या अणुकरणात

रमणारा शिष्य गुरु प्रिय असतो. मग आत्महत्या करण्यासारखे शूद्र विचार त्याच्या मनाला शिवनार नाहीत .

जीवन जगण्यासाठी दृढ निश्चयाची गरज आहे परिश्रम करून यश संपादन करण्याची जिद्द असावी लागते दृढ निश्चयासाठी अभ्यासाची गरज असते ज्ञानाचा परिपूर्ण उपयोग करून निर्णय क्षमता वाढविली पाहिजे एव्हडे सगळे असल्यास गुरु मार्गदर्शन लाभण्यास विलंब लागत नाही

गुरुतत्वले अनादी अनंत आहे. गुरु हेच श्रेष्ठ दैवत आहे. गुरु ह्या शद्बा मध्ये ''ग'' कार हा सिद्धी देणारा ''र'' कार हा पाप हारक तर ''ऊ'' कार हा अव्यक्त विष्णु उमापती, ब्रम्हा आहे (ज्याची ह्या सगुण भक्तीवर श्ृद्धा आहे त्या प्रमाणे त्याला फल प्राप्ती होते . म्हणून सदगुराला श्रेष्ठ दैवत मानले आहे. ब्रम्हा विष्णू, महेश, ह्या तिन्ही देवतामध्ये गुरुतत्व समानच सामावलेले आहे त्याच्यामुळे मनुष्य जीवन आनंदी. समाधानी, होवून जीव शिवाशी एकरूप होण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी गुरुपदेश कारणीभूत आहे.

जीवनाला योग्य दिशा दिल्यास सर्वकर्तव्ये पूर्ण करता येतात तीच योग्य दिशा देण्याचे काम सद्गुरू करीत असतात.

त्यातून शिष्याचे मनोबल वाढविण्याच्या प्रयत्नात असतो. पण शिष्याचा त्यांच्या आदेशावर, सुचनावर विश्वास असावाच लागतो. त्यांच्या आदेशाबरीबरच नामस्मरणाचे आदेश तंतोतंत पालन करावे लागते तसे केल्यास ईश्वरशक्ती ही त्याला सुलभतेने साथ देत असते व शिष्याचा झानदीप उजळून निघतो. आत्महत्येच्या विचारा पासून दुर जाऊन सकारात्मक विचाराने आपल्या कुटुम्बीया च्या समस्या विश्वासाने दृढनिश्चयाने सोडवू शकतो. आलेल्या संकटाशी निकराने दूर करू शकतो आणि आनंद पर्वात आपले जीवनातील वसंत क्षण – अनुभवण्यास पात्र होऊ शकतो.

***

## ज्येष्ठ समाजवादी विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन

ज्योतिर्मय साहित्य



पुणे : ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, गांधीवादी कार्यकर्ते, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष, माजी आमदार, लेखक आणि युवकांचे प्रेरणास्थान असलेल्या 'युवक क्रांती दला'चे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी (वय ८५) यांचे शनिवारी पुण्यातील खासगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी डॉ. ऊर्मिला सप्तर्षी, मुलगा आणि सून असा परिवार आहे.

डॉ. सप्तर्षी यांना मधुमेहाचा त्रास होता. शनिवारी सकाळी अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांपूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. डॉ. सप्तर्षी यांच्या पार्थिवावर सोमवारी (२० जुलै) वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यापूर्वी कोथरूड येथील गांधी भवन येथे सकाळी दहा ते बारा या वेळात त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.

समाज परिवर्तनाची चळवळ उभारणाऱ्या डॉ. सप्तर्षी यांनी आपल्या आयुष्यभर समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार केला. युवकांना संघटित करून सामाजिक आणि राजकीय परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने त्यांनी 'युवक क्रांती दल' (युक्रांद) या संघटनेची स्थापना केली होती. युक्रांदच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणांना सामाजिक भान, लोकशाही मूल्ये आणि परिवर्तनवादी विचारांची प्रेरणा दिली. ते केवळ सामाजिक कार्यकर्ते नव्हते, तर ते एक प्रभावी लेखक, अभ्यासू विचारवंत आणि वक्ते म्हणूनही ओळखले जात होते. समाजातील विषमता, अन्याय, भ्रष्टाचार आणि लोकशाही मूल्यांच्या ऱ्हासाविरोधात त्यांनी सातत्याने आवाज उठवला. त्यांच्यावर महात्मा गांधी, जयप्रकाश नारायण आणि समाजवादी विचारधारेचा प्रभाव होता.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक आंदोलनांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. ग्रामीण विकास, शैक्षणिक सुधारणा, युवकांचे सक्षमीकरण आणि लोकशाही हक्कांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. 'सत्याग्रही विचारधारा' मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी बरीच वर्षे काम केले. त्यांच्या लेखनातून आणि व्याख्यानांतून अनेक पिढ्यांना वैचारिक दिशा मिळाली. डॉ. कुमार सप्तर्षी यांनी विविध पुस्तके, लेख आणि भाषणांमधून समाजातील ज्वलंत प्रश्नांवर भाष्य केले. समाजकारणाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन व्यापक आणि परिवर्तनवादी होता. त्यामुळेच ते युवकांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान बनले होते. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे विश्वस्त म्हणून ते कार्यरत होते.

## अण्णाभाऊचे लोकसाहित्य मराठी भाषेतील अनमोल ठेवा- प्रा. विठ्ठल बरसमवाड




ज्योतिर्मय साहित्य

पाथर्डी : महात्मा गांधी विद्यालय येळी ता. पाथर्डी येथे १८ जुलै रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे आदरणीय प्राचार्य विलास वाळुंजकर यांनी त्यांच्या प्रतिमेचे पुजन केले. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे लोकसाहित्य हे शब्दरूपी तलवार आहे. त्यांनी उपेक्षितांच्या सर्व वेदना त्यांच्या कादंबरीतून मांडल्या त्यामुळे त्यांचे लेखन इतिहासातील अनमोल ठेवा आहे.असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक विठ्ठल बरसमवाड यांनी यावेळी केले. प्राचार्य वाळुंजकर विलास यांनी विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठेचे जीवन व कार्य सांगितले.

यावेळी बडे आश्विनी, बडे ज्ञानेश्वरी, पाखरे प्रांजल, घुले कार्तिकी पाखरे अदिती या विद्यार्थिनींचे भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेख सिंकदर यांनी केले. तर सूत्रसंचालन अर्जुन गायकवाड अनुमोदन विजयकुमार चव्हाण यांनी तर आभार राजेंद्र हंडाळ यांनी मानले

यावेळी शेलार पोपट, ढोले प्रदीप व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### रामराज्य (भाग १)



भरताने प्रभू श्रीरामांच्या पादुका सिंहासनावर ठेवून चौदा वर्षे अयोध्येचा कारभार सांभाळला, ही केवळ एक भावनिक किंवा कौटुंबिक कथा नाही. यामागे एक अत्यंत प्रगल्भ राजकीय, मानसशास्त्रीय आणि आध्यात्मिक दृष्टिकोन आहे.

१. न्यायशास्त्राचा 'न्यास' सिद्धांत: आधुनिक कॉर्पोरेट किंवा राजकीय जगतात ज्याला आपण 'ट्रस्टीशिप' (विश्वस्त भावना) म्हणतो, त्याचे भरत हे जगातील पहिले आणि सर्वोत्तम उदाहरण आहेत. राज्य आपले नाही, आपण केवळ त्याचे रक्षक आहोत, हा विचार पादुका सिंहासनावर ठेवून अधोरेखित होतो.

♦ अहंकाराचे विसर्जन व नैतिक अधिष्ठान : जेव्हा एखादी व्यक्ती सर्वोच्च पदावर बसते, तेव्हा सत्तेचा अहंकार येण्याची शक्यता असते. भरताने पादुकांना राजा मानून स्वतःला 'सेवक' घोषित केले. यामुळे सत्तेचा दुरुपयोग टळला आणि संपूर्ण प्रजेला एक सर्वोच्च नैतिक आदर्श मिळाला.

प्रतीकशास्त्र : पादुका हे केवळ पादत्राण नसून ते रामाच्या 'कर्तव्य, धर्म आणि न्याय' या मूल्यांचे प्रतीक होते. राजा प्रत्यक्ष हजर नसला तरी त्याचे 'नियम आणि मर्यादा' अयोध्येत लागू आहेत, हा विश्वास प्रजेत निर्माण करण्यासाठी हे प्रतीक उपयुक्त ठरले.

मानसशास्त्रीय प्रभाव : भरताने स्वतः राजवैभव नाकारून नंदिग्राम येथे तपस्व्याप्रमाणे राहून राज्य केले. यामुळे जनतेच्या मनात भरताबद्दल प्रचंड आदर निर्माण झाला आणि रामाच्या विरहाने व्याकुळ झालेल्या प्रजेला एक भावनिक आधार मिळाला.

२. वाल्मीकि रामायणात या घटनेचे अत्यंत सुंदर वर्णन आढळते. जेव्हा भरत चित्रकुटावरून रामाच्या पादुका घेऊन अयोध्येला परततात, तेव्हा ते त्या पादुकांना सिंहासनावर स्थापित करतात.

अयोध्येत पादुकांचे आगमन आणि भरताची प्रतिज्ञा:

ततः शिरसि कृत्वा तु पादुके भरतस्तदा।
आरुरोह रथं हृष्टः शत्रुघ्नेन समन्वितः॥
(वाल्मीकि रामायण, अयोध्याकाण्ड, ११५.५)

## संतांची शिकवण आणि आजचा समाज

अमोल बोरीकर 86240 03013



पहाटेच्या शांत वेळी संतांचे अभंग कानावर पडतात आणि मन प्रसन्न होतं. पण दिवसभराच्या व्यवहारात तेच मन राग, द्वेष, मत्सर, स्वार्थ आणि अहंकाराने भरून जातं. तेव्हा एक प्रश्न अस्वस्थ करतो—संतांचे अभंग आपल्या ओठांवर आहेत, पण संतांचे विचार आपल्या आचरणात का नाहीत?

आज आपण अभिमानाने म्हणतो, "हा संतांचा महाराष्ट्र आहे." पण मनाला एक प्रश्न सतत टोचत राहतो—जर हा खरोखर संतांचा महाराष्ट्र असेल, तर माणसामाणसांत एवढा दुरावा का? एवढा द्वेष का? एवढा अहंकार का?

संत ज्ञानेश्वर यांनी संपूर्ण विश्वाला "माऊली" मानलं. नामदेव यांनी देवाशी मित्रासारखा संवाद साधला. एकनाथ यांनी अपमान सहन करूनही क्षमेची वाट सोडली नाही. तुकाराम यांनी रंजल्या-गांजल्यांमध्येच विठ्ठल पाहिला. त्यांनी कधीही धर्म माणसापेक्षा मोठा मानला नाही; माणूसच त्यांचा धर्म होता.

संतांनी कधीच जातीची भिंत उभी केली नाही; त्यांनी "माऊली" हा शब्द देऊन प्रत्येकाला आपलंसं केलं. त्यांनी संपत्तीपेक्षा समाधान, अहंकारापेक्षा नम्रता, कर्मकांडापेक्षा सेवा आणि धर्मापेक्षा माणुसकी मोठी मानली. म्हणूनच त्यांचे विचार शेकडो वर्षांनंतरही तितकेच जिवंत आहेत.

ज्ञानेश्वर माऊलींनी 'पसायदाना'च्या माध्यमातून संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची आणि जगातील खलवृत्ती नष्ट होऊन माणसामाणसांत मैत्र निर्माण होण्याची प्रार्थना केली. संतांनी जात, पात, धर्म या पलीकडे जाऊन माणसाला माणूस म्हणून जगण्याचा संदेश दिला. निसर्गाचे महत्त्व सांगताना "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" असा पर्यावरणपूरक विचार त्यांनी मांडला.

पण आज...

घरात देवांची संख्या वाढली, माणुसकीची उणीवही वाढली.

सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव होतो, पण शेजाऱ्याच्या दुःखात खांदा देणारे हात कमी झाले.


देवळात सोन्याचे मुकुट चढतात, पण वृद्ध आई-वडिलांच्या डोक्यावर प्रेमाने हात फिरवायला वेळ मिळत नाही.

आरती मोठ्या आवाजात होते, पण घरातील नात्यांचा संवाद मात्र शांत झालेला आहे.

हे पाहून वाटतं... संतांचे अभंग आपण मुखोद्गत केले; पण त्यांचं आयुष्य मात्र विसरलो.

आज विज्ञानाने अंतर कमी केलं, पण मनांमधील दुरावा वाढला. मोबाईलने संपर्क वाढवला, पण संवाद हरवला. संपत्ती वाढली, पण समाधान कमी झालं. अशा काळात संतांचे विचार हे फक्त वाचण्याचे नाहीत; जगण्याचे आहेत.

संतांची खरी पूजा त्यांच्या प्रतिमेला हार घालण्यात नाही... तर त्यांच्या विचारांना आपल्या स्वभावात फुलवण्यात आहे. ज्या दिवशी प्रत्येक घरात प्रेम वाढेल, प्रत्येक मनात क्षमा फुलेल, प्रत्येक हात सेवेसाठी पुढे येईल आणि प्रत्येक ओठांवरून "माऊली" ही हाक मनापासून उमटेल, त्या दिवशी संत पुन्हा जन्म घेणार नाहीत... कारण ते आपल्या प्रत्येक कृतीत जिवंत झालेले असतील. आणि त्या दिवशीच समाजाला विठ्ठल पुन्हा सापडेल.




# कालिदास - संस्कृत भाषेचे महान सर्वश्रेष्ठ कवी आणि नाटककार

**ज्योतिर्मय साहित्य**

पुढे....... आपल्या प्रिय पत्नीच्या वियोगाने दग्ध झालेल्या पीडित व अत्यंत व्यथित असल्यामुळे यक्षाच्या मणिबंधातील (मनगटातील) सुवर्णकंकण, तो देहाने क्षीण झाल्यामुळे शिथिल (ढिले) होऊन भूमीवर पडले आणि त्याचे मणिबंध सुने सुने दिसत होते! आषाढाच्या प्रथम दिनी त्याच्या दृष्टीस पडला तो एक कृष्णवर्णी मेघ! तो रामगिरी पर्वताच्या शिखराला कवेत घेऊन क्रीडा करीत होता, जणू एखादा हत्ती मातीच्या ढिगाऱ्याची माती उपटण्याचा खेळ करतो.

प्रिय मैत्रांनो! हाच तो श्लोकातील काव्य प्रतिभेचा जणू काही तीन अक्षरी बीजमंत्र ''आषाढस्य प्रथम दिवसे''! या मंत्राचे प्रणेते कालिदास यांच्या स्मृतीस अभिवादन करून प्रत्येक वर्षी आपण आषाढ महिन्याच्या प्रथम दिनी (आषाढ शुक्ल प्रतिपदा) कालिदास दिन साजरा करतो. हा आषाढमासाचा प्रथम दिन म्हणजे 'कालिदास दिन' आहे, कालिदास जयंती नव्हे, कारण त्यांच्या प्रत्यक्ष जीवनाविषयी फारच कमी माहिती उपलब्ध आहे. ज्या रामगिरी (आत्ताचे रामटेक) पर्वतावर कालिदासांना हे काव्य स्फुरले, त्याच कालिदासांच्या स्मारकाला लोक भेट देतात, अखिल भारतात याच दिनी कालिदासमहोत्सव साजरा केल्या जातो! मंडळी, आपल्याला अभिमान वाटेल, असे महाराष्ट्रातील प्रथम कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक येथे स्थापन झाले. यंदा आपण 'कालिदास दिन' साजरा करतोय १५ जुलै या तारखेला. त्या दिनाचे स्मरण करून आणि कालिदासांना आदरांजली वाहण्याच्या हेतूने हा लेख लिहिला आहे!

आधी सांगितल्याप्रमाणे यक्षाला आषाढाच्या प्रथम दिनी (आषाढस्य प्रथम दिवसे) पर्वतशिखरांना लिप्त करून आलिंगन देणारा मेघ, क्रीडा करणाऱ्या प्रेक्षणीय हत्तीप्रमाणे दिसला. १२१ श्लोक (पूर्वार्ध म्हणजे पूर्वमेघ - ६६ श्लोक आणि उत्तरार्ध म्हणजे उत्तरमेघ - ५५ श्लोक) असलेले हे सकल खंडकाव्य फक्त आणि फक्त एकच वृत्त, मंदाक्रांता वृत्तात (ह्या वृत्ताचे प्रणेते स्वतः कालिदासच!) गेय काव्यात छंदबद्ध करणे ही प्रतिभा (आणि प्रतिमा नव्हे तर प्रत्यक्षात) केवळ आणि केवळ कालिदासांचीच!




यक्ष आकाशातील मेघालाच आपला सखा समजून दूत बनवतो, त्याला रामगिरी रामटेक ते अलकापुरचा मार्ग सांगतो, आपल्या प्रियतमेचे विरहाने झालेले क्षतिग्रस्त शरीर इत्यादीचे वर्णन करून, मेघाला आपला संदेश त्याच्या प्रियतमेपर्यंत पोचवण्याची काकुळतेने विनंती करतो! मंडळी, यक्ष आहे जमिनीवर, पण पूर्वमेघात तो मेघाला प्रियतमेच्या नगरीपर्यंत जाण्याचा मार्ग सांगतो, यात ८ पर्वत आणि ९ प्रदेश आणि १० नद्यांचे भौगोलिक असूनही विहंगम अन रमणीय वर्णन (एखाद्या पक्षाला आसमंतातून दिसेल असे, 'बर्ड्स आय व्ह्यू' किंवा अभियांत्रिकी शब्दात सांगायचे तर 'टॉप व्ह्यू') आले आहे. विदर्भातील रामगिरीवरून या मेघदूताचा हिमालयाच्या कुशीत वसलेल्या अलकानगरीपर्यंतचा प्रदीर्घ प्रवास यात वर्णन केला आहे. वाटेतल्या निसर्गाच्या अप्रतिम वर्णनानी नटलेले हे काव्य म्हणजे निसर्गवर्णनाचा अत्युच्च साहित्याविष्कार! नर्मदा, वेत्रवती नदी, विदिशा नगरी, कदंब वृक्षांनी नटलेले पर्वत, उज्जैन, अवंती नगरी, क्षिप्रा नदी, महांकालेश्वर यांचे वर्णन करत या मेघाचा प्रवास गंभीरा नदी, हिमालयाच्या कुशीत उगम पावलेली जान्हवी (गंगा) नदी व मानस सरोवरापर्यंत होतो. शेवटी कैलासाच्या कुशीत वसलेल्या अलकानगरीत मेघ पोचतो. इथे आपल्याला मेघाची प्रियतमा विद्युल्लता आपल्याला भेटते. पूर्वमेघात रामगिरी ते अलकापुरीच्या वाटेत सरिता तरंगिणी, पर्वतराजी, वृक्षवेली पशु-पक्षी व विविध स्वभावाच्या स्त्रिया यांचे वर्णन करीत हा यक्ष या सर्वांना या रम्य प्रवासातील पात्रच बनवीत मेघाला प्रणयाचे पाठच पढवीत आहे!




उत्तर मेघ हा यक्षाने प्रेयसीला दिलेला संदेश आहे. प्रियेने विरहव्याधीमुळे प्राणत्याग करू नये आणि धीर धरावा असा संदेश तो यक्ष मेघाकरवी पाठवतो. तिला तो मेघाद्वारे संदेश देतोय ''आता शाप समाप्त व्हायला अवघे चार मासच उरले आहेत, मी कार्तिक मासात येतोच आहे.'' विरहिणी यक्षपत्नी आणि स्वतःच्या अलकापुरीतील गृहाचे चलचित्रासमान दर्शन घडवीत काव्याच्या अंतिम श्लोकात हा यक्ष मेघाला म्हणतो ''तुझा मात्र तुझ्या प्रिय विद्युलतेशी कधीही वियोग न घडो!'' असे हे यक्षाचे विरहगान आहे.

मित्रांनो! स्टोरी काही विशेष नाही, आपण अरसिक पत्र लिहितो तेव्हा पोस्टल ॲड्रेस लिहितो, आत ख्यालीखुशालीच्या ४ ओळी! पण ॲड्रेस बिनचूक, विस्तृत अन आतला मजकूर रोमँटिक असल्यामुळे पोस्टखात्याला भावेल असा असेल तर मग त्या लेखकाला पोस्टखाते पोस्टाचे तिकीट काढून सन्मानित करेल की नाही! खालील पोस्टाचे सुंदर तिकीट हे कालिदासाच्या ॲड्रेस लिहिण्याच्या कौशल्याला केलेला दंडवतच समजा! या काळात कालिदास असते तर, तेच निर्विवादपणे या खात्याचे ब्रँड अम्बॅसेडर राहिले असते! कालिदासांनी आपल्या या अद्वितीय दूतकाव्यात दूत म्हणून अत्यंत विचारपूर्वक आषाढातील निर्जीव पण बाष्पयुक्त धूसर वर्णाच्या मेघाची निवड केलीय, कारण हा जलयुक्त मेघसखा रामगिरी ते अलकापुरी हा दीर्घ प्रवास करू शकेल याची त्याला खात्री आहे! शरदऋतूतील मेघ रिताच असतो, शिवाय आषाढ महिन्यात संदेश पाठवला तर तो त्याच्या प्रियेपर्यंत शीघ्र पोचेल असे यक्षाला वाटले असावे!

(क्रमशः)


# अमेरिका दर्शन : नायगारा फॉल

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

न्यूयॉर्क

आमची टूर ची सुरुवात जरी न्यूयॉर्कहून झाली होती तरी न्यूयॉर्क शहर दर्शन करायचे राहिले होते. त्यामुळे आम्ही न्यूयॉर्क ला पोचलो आणि दुसरे दिवशी सकाळीच न्यूयॉर्क दर्शन सुरू झाले. ९/११ च्या विमान हल्ल्यात दहशतवाद्यांनी उध्वस्त केलेले वर्ल्ड ट्रेड सेंटर शहीद स्मृती स्थळ बघून मन सुन्न झाले. कितीतरी निरपराध लोक या घटनेत मृत्युमुखी पडले होते. त्यांचे हे स्मृती स्थळ खरोखरच दहशतवादाचे भयानक रूप आणि त्यांनी केलेली माणुसकीची हत्या यांची जाणीव करून देते. तेथून आम्ही स्टॅचू ऑफ लिबर्टी बघण्यासाठी फेअरी बोर्डिंग स्टँड ला आलो टूर मॅनेजर ने बोर्डिंग पास आम्हाला दिले आणि आम्ही बोर्ड झालो. अथांग अशा प्रशांत महासागरातून स्टॅचू ऑफ लिबर्टी दिशेने आमची मोटार बोट निघाली. वारा खुप जोरात होता त्यामुळे समुद्रावर लाटा उसळत होत्या आणि त्यामुळे बोट हेलकावे खात होती पण दुसरीकडे कधी एकदा स्टॅचू ऑफ लिबर्टी बघतो असे झाले होते समुद्र शांत असेल तरच स्टॅचू ऑफ लिबर्टी ला उतरता येईल अन्यथा दुरूनच बघावं लागेल असे आधीच सांगितले होते त्यामुळे उसळणाऱ्या लाटा बघून शंका येताच होती आम्ही स्टॅचू ऑफ लिबर्टी जवळ पोचलो पण त्या छोट्या बेटावर बोटीतून उतरणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले दुरूनच मग फोटो काढून व स्टॅचू ऑफ लिबर्टी बघून आमची बोट परत फिरली शेवटी सर्वांची सुरक्षितता महत्वाची होती. परत आल्यावर मॅडम तुसा म्युझियम बघायला गेलो. तेथील आइन्स्टाइन, जॉर्ज बुश, बिल क्लिंटन, काही हॉलिवूड स्टार, खेळाडू अशा अनेक दिग्गजांचे हुबेहूब खरे वाटणारे स्टाचू बघून मजा आली त्यांच्या सोबत फोटोही काढले. सायंकाळी आमची परतीची फ्लाईट असल्याने परत न्यूयॉर्क एअरपोर्ट कडे निघालो. परतीची फ्लाईट न्यूयॉर्क पासून डल्लास पर्यंतच होती तिथून दुसरी फ्लाईट ह्युस्टन साठी होती . आम्ही डल्लास ला पोचलो पण वीस मिनिटे लेट आमची फ्लाईट पोचली होती त्यामुळे आमची कनेक्टिंग फ्लाईट तोपर्यंत निघाली होती आम्हाला बोर्ड करता आले नाही. आम्ही तेथील बोर्डिंग काउंटरकडे या बाबत तक्रार केली कारण यात आमची काहीच चूक नव्हती इतरही काही प्रवासी होते त्यांचीही फ्लाईट मिस झाली होती त्यामुळे तेथील अधिकाऱ्यांनी पहाटेच्या ह्युस्टन फ्लाईट चे बोर्डिंग पास आम्हाला दिले.तीन चार तास वाट पाहून मग आम्ही फायनली ह्युस्टन फ्लाईट मध्ये बोर्ड झालो आणि आमची अमेरिका दर्शनची अशी ही आमची छोटी एक आठवड्याची टूर संपवून आम्ही परत ह्युस्टन ला मुलीकडे आलो.ह्युस्टन येथे एक महिना आम्ही थांबलो पण मायदेशी परतण्याची ओढ आम्हाला लागली होती.






आयुष्यात अमेरिका दर्शन घडले तसेच तेथील वास्तव्याचा अविस्मरणीय अनुभव आणि आठवणी गाठीशी घेऊन पुन्हा आपल्या मायदेशी म्हणजेच भारतात आम्ही परत आलो. भव्य अमेरिका दर्शन करून आलो तरी मेरा भारत महान ही मातृभूमी बद्दलची पवित्र भावना आपल्या सर्वांच्या मनात असतेच.

# पाऊले चालती पंढरीची वाट

**ज्योतिर्मय साहित्य**

वारीचे बदलते स्वरूप

'' पुंडलिका वरदे. ..ग्यानबा तुकाराम!'' चे अखंड स्वर कानात दुमदुमत होते,गजर करत होते. पुण्यातील पालखीचा मुक्काम वारीची परंपरा महाराष्ट्रातील संतपरंपरेतून विकसित झाली. पंढरपूर येथील श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आषाढी आणि कार्तिकी एकादशीला नियमितपणे जाण्याची प्रथा अनेक शतकांपासून सुरू आहे. या परंपरेला संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज आणि संत तुकाराम महाराज यांनी भक्ती, समता आणि नामस्मरणाचा दृढ पाया दिला.

ज्ञानदेवांच्या पालखी सोहळ्यास पूर्वी हत्ती, घोडे वगैरे लवाजमा श्रीमंत राजेसाहेब यांच्याकडून येत असे. या खर्चास साहाय्य त्या त्या वेळचे राजे व श्रीमंत पेशवे सरकार करीत असे. पुढे कंपनी सरकारचा अंमल सुरू झाल्यावरही खर्चाची तरतूद सरकारकडून होत असे. सरकारने इ.स. १८५२ मध्ये पंचकमिटी स्थापन करून त्या कमिटीच्या नियंत्रणाखाली ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची व्यवस्था केली. तर तुकाराम महाराजांचे पूर्वज विश्वंभर बाबा हे ज्ञानदेव-नामदेवांच्या काळातीलच होते. त्यांच्या घराण्यात पंढरीची वारी होती. स्वतः तुकोबा चौदाशे टाळकरी घेऊन प्रत्येक शुद्ध एकादशीस पंढरपुराला जात असत. तुकोबांच्या निधनानंतर त्यांचे कनिष्ठ पुत्र नारायण महाराज यांनी वारीचे रूपांतर पालखी सोहळ्यात केले.

वारीत श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, अधिकारी, कलाकार अशा सर्व स्तरांतील लोक कोणताही भेदभाव न ठेवता एकत्र चालतात. येथे कोणाची जात, धर्म, पद किंवा संपत्ती महत्त्वाची नसते; ''माऊली'' हीच सर्वांची समान ओळख असते. वारीमध्येपालखीला खूप महत्व आहे.डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन, हातात टाळ,मृदंग घेऊन थंडी,वारा ऊन,पाऊस कशाचीही पर्वा नं करता अखंड विठ्ठल,संतांच्या नावाचा जयघोष करत, फुगड्या,फेर, यासारखे खेळखेळत, छान छान भजने, अभंग गात ही वारी मोठ्या जोशात करतात हे वारकरी! रिंगण हा सुद्धा यातील मोठा आकर्षक सोहळा असतो.

वारी मार्गावर काही ठराविक गावांमध्ये रिंगण आयोजित होते. मोकळ्या जागेत याचे आयोजन केले रिंगण कार्यक्रमात या अश्वाचे महत्व विशेष असते.

चांदोबाचा लिंब,बाजीराव विहीर,वाखरी,

माळशिरस,ठाकुर बुवा समाधी,भंडीशेगाव

येथे घोड्यांचे रिंगण केले जाते तर संत सोपानकाकांच्या पालखी सोहळ्यातील

मेंढ्यांचे रिंगण हे पिंपळी आणि इंदापूर येथे होते. हे पाहण्यासाठी खूपच गर्दी होते.




वारकरी संप्रदायात वारीची प्रेरणा सर्व संतांच्या शिकवणीत आहे. ''नामस्मरण, समता, सेवा, प्रेम आणि मानवता'' हा वारीचा मूलमंत्र आहे. वारी माणसाला अहंकाराचा त्याग, साधेपणा, संयम, परस्पर सहकार्य आणि सर्वांशी समानतेने वागण्याची शिकवण देते. साऱ्यांचे ध्येय एकच असते,ते म्हणजे विठ्ठलाची भेट!

रंगाने काळा कुळकुळीत असूनही तेजस्वी कांती,रूपाचा हा विठ्ठल म्हणूनच सर्वांना आपल्यातीलच वाटतो. साधेपणातसुद्धा किती सौन्दर्य, मोठेपणा असतो,याचा प्रत्यय याच्या चरणाशी लागताच सर्वांनाच जाणवतो. म्हणूनच मोठे मोठे नेते सुद्धा याच्या दर्शनाची आस मनात ठेवून लांबून लांबून येतात तर लाखो भाविकसुद्धा त्याच उत्कटतेने दर्शनासाठी कष्ट झेलून येत असतात.

काळानुसार वारीचे स्वरूप बदलले असले तरी तिचा मूळ गाभाभक्ती, समता आणि सेवाआजही तितकाच जिवंत आहे.त्यामुळे वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून समाजप्रबोधन, लोकशिक्षण आणि सामाजिक ऐक्याची चळवळ आहे.

पूर्वी वारकरी पायी चालत, साधे कपडे, कित्येक तरी अनवाणी पायी वारी चालत होते. तेंव्हा रस्ते सुद्धा नीट नव्हते. खाणे,पिणे तर दिवसभरात अगदीच जेमतेम असायचे. कारण पोट भरले तर चालणे कठीण होते, आळस येतो उलट पोटात भूक असेल तर आपोआप देवाचे नामस्मरण ओठात येते अशी धारणा होती

कमीत कमी सामान ते ही स्वतःला उचलून चालत जाता येईल इतकेच असायचे. कारण सोबत गाड्या वगैरे नसत. थोडासा शिधा सोबत असायचा. तो सुद्धा स्वतः जेमतेम अगदी गरजेपूरता खायचा आणि बाकी गरजू,गरिबाना द्यायचे. फार पूर्वी तरी फोनसुद्धा नव्हते त्यावेळी वारीला जाऊन आलेला वारकरी म्हणजे जग जिंकून आलेला योद्धाच वाटायचा. त्याचे दर्शन घेणे म्हणजे साक्षात विठ्ठलाचे दर्शन वाटायचे. आणि तशीच परिस्थिती होती.

आज मात्र उत्तम रस्ते,सोयिस्कर आणि अल्प दारातील वाहतूक व्यवस्था, मोफत वैद्यकीय सेवा, ते सुद्धा कित्येक नामवंत डॉक्टर्स, नर्सेस यांच्या सहित!, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जागोजागी फिरती स्वच्छतागृहे, मोबाईल फोन, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांमुळे वारी अधिक सुकर आणि नियोजनबद्ध झाली आहे. प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि अनेक सेवाभावी संघटना वारकऱ्यांना विविध सुविधा पुरवतात.




तंत्रज्ञानामुळे पालखी सोहळ्याचे थेट प्रक्षेपण, ऑनलाइन माहिती आणि डिजिटल माध्यमातून जनजागृती शक्य झाली आहे. त्यामुळे जगभरातील सारे भाविकही वारीचा अनुभव घेऊ शकतात. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धन, प्लास्टिक मुक्त वारीआणि स्वच्छतेबाबतही लोकात जागरूकता वाढत आहे.

तथापि, वाढती गर्दी, व्यापारीकरण, ध्वनीप्रदूषण आणि काही ठिकाणी पारंपरिक शिस्तीचा अभाव अजूनही आहे

अशा प्रकारे, वारीचे स्वरूप काळानुसार बदलले असले तरी भक्ती, समता, बंधुभाव आणि विठ्ठलनामाचा अखंड गजर ही तिची शाश्वत ओळख आजही कायम आहे

अलीकडच्या काळात वारीचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलत आहे. पूर्वी वारीत प्रामुख्याने श्रद्धावान वारकरी सहभागी होत असत. आज मात्र हौसे, नवसे आणि गवसे यांचाही सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. हौसे म्हणजे उत्सुकता, अनुभव किंवा पर्यटनाच्या दृष्टीने वारीत सहभागी होणारे लोक. नवसे म्हणजे नवस पूर्ण करण्यासाठी वारी करणारे भाविक. आणि गवसे म्हणजे प्रसिद्धी, मनोरंजन, वैयक्तिक स्वार्थ किंवा इतर कारणांसाठी वारीत सहभागी होणारे लोक

या वाढत्या सहभागामुळे काही चांगले, , सकारात्मक परिणाम दिसून येतात. वारीची परंपरा अधिक व्यापक होत आहे, तरुण पिढीला वारीची ओळख होत आहे, समाजात भक्ती, सेवा आणि सहकार्याची भावना वाढीस लागते. तसेच विविध सामाजिक उपक्रम, आरोग्य सेवा आणि पर्यावरणाबाबत जनजागृती करण्यासही मदत होते.

मात्र याचे काही नकारात्मक परिणामही जाणवतात. अनावश्यक गर्दी वाढते, शिस्तीचा भंग होतो, काही ठिकाणी वारीचे व्यापारीकरण होते, ध्वनीप्रदूषण आणि कचऱ्याचे प्रमाण वाढते. खऱ्या वारकऱ्यांना नामस्मरण आणि फक्त अगदी मोजके खाणे याव्यतिरिक्त काहीच गरजेचे नसते. त्यांची ओढ फक्त विठ्ठलाला भेटण्याची असते.कपडे, राहण्याची उत्तम सोय किंवा खाण्यापिण्याची बडदास्त असे काहीच लागत नाही. फक्त रात्री झोपण्यासाठी एक सतरंजी आणि जमीन एवढेच पुरेसे असते त्यांच्यासाठी. पण इतर वारकऱ्यांना मात्र कितीही सुविधा दिल्या,तरी त्या कमीच असतात. रस्ते उत्तम हवेच असतात, राहण्याची ,जेवण्या

खाण्याची छान व्यवस्था लागते. अशा लोकांसाठी काही खास मोठ्या दिंडयाही

असतात. लोक सुद्धा श्रद्धेने गरजेपेक्षाही

कधी कधी जास्तच अन्नदान करतात. कधी तर त्यामुळे अन्नाचा अपव्यय सुद्धा होतो. तसेंच छोट्या चोऱ्या,भांडणेसुद्धा

होतात यात कधी कधी. अर्थात ही मनोवृत्ती आहे. पण आपण वारकरी म्हणून वारी करत आहोत याचे भानही त्यांनी राखलेच पाहिजे किमान अशा वेळी तरी नाहीका?काहीजण वारीकडे धार्मिक साधनेपेक्षा मनोरंजन किंवा प्रसिद्धीचे साधन म्हणून पाहतात, त्यामुळे वारीची आध्यात्मिकता काही प्रमाणात कमी होत असल्याची भावना व्यक्त केली जाते. वारी ही केवळ पायी चालण्याची परंपरा नसून ती संतांच्या विचारांचा आणि समतेचा संदेश देणारी जीवनशैली आहे. त्यामुळे कोणत्याही हेतूने वारीत सहभागी झाले तरी प्रत्येकाने वारकरी संप्रदायाची शिस्त, साधेपणा, स्वच्छता आणि भक्तिभाव जपणे आवश्यक आहे. तेव्हाच वारीचे पावित्र्य आणि सांस्कृतिक महत्त्व कायम राहील.म्हणूनच संतांनी म्हटलेच आहे,''एक तरी वारी जरूर करावी.''

वारी ही महाराष्ट्राची केवळ धार्मिक परंपरा नसून संस्कृती, समता, सेवा, शिस्त आणि मानवतेचा अखंड उत्सव आहे.

जय जय विठोबा रखुमाई

## बेसनाचे वेगळे रवाळ लाडू

**ज्योतिर्मय साहित्य**



बेसनाचा लाडू हा बहुतेक सर्वांनाच आवडतो. काही वेळा बेसन व्यवस्थित खमंग भाजले गेले नाही,तर हा लाडू थोडासा चिकट बनतो. खाताना तोंडात दाताना,टाळूला चिकटतो. त्यामुळे मग तो आवडतं नाही किंवा नकोसा वाटतो. म्हणूनच या वेगळ्या पद्धतीने बनवले तर हे लाडू खमंग तरी लागतातच,पण रवाळ सुद्धा बनतात. पहायचे आहे?

साहित्य:

१ वाटी बेसन, पाऊण वाटी साखर, १ चमचा वेलदोड्याची जाडसर पूड, पाऊण ते १ वाटी साखर,शक्यतो तळण्यासाठी तूप , शक्य नसेल तर रिफाईंड तेल, लाडूला वर लावण्यासाठी काजूचे तुकडे, आवडत असेल तर पाकात घालण्यासाठी किंचित जिलेबीचा रंग.

कृती:

प्रथम बेसन चाळून घ्यावे. मग ते एका बाऊल मध्ये काढून त्यात अगदी चिमूटभर मिठ टाकावे. नंतर त्यात २ चमचे तेल किंवा अर्धा चमचा बेकिंग सोडा घालून हे मिक्स करावे. त्यानंतर त्यात पाणी घालत घालत व्हिस्करने हलवत भज्याच्या पिठापेक्षा अगदी किंचित सैलसर भिजवून

हे पाच मिनिटे ठेवावे.

गॅसवर कढई ठेवून त्यात तूप किंवा तेल घालून चांगले गरम झाल्यावर त्यात तारेच्या चालनीतून किंवा मोठ्या डावाने हे भिजलेले पीठ घेऊन जास्तीतजास्त बारीक धार सोडत घालावे व छान सोनेरी तांबूस झाले की तळून तारेच्या चालणीत घालावे. हे सर्व तळून थोडे थंड झाले की हातानी तुकडे करून मिक्सरच्या भांड्यात गाळून व्हायपर वर फिरवत बारीक करून घ्यावे.




आता गॅसवर कढईमध्ये साखर घालून त्यात एक वाटीभर पाणी घालावे व त्याचासाखर पूर्ण विरघळून २-३ मिनिटे ठेवुन पाक करावा .त्यात थोडासा रंग आणि वेलदोडयाची पुड घालावी. त्यात मिक्सर मधून बारीक केलेले बेसन घालावे व व्यवस्थित मिक्स करून अजून साधारण ३-४ मिनिटे मंद गॅसवर परतावे.गोळा होईपर्यंत हे परतावे. थोडेसे हे सैलसरच असावे. वळण्यासारखे थंड झाले की त्यात आवडीनुसार काजू, बदाम,पिस्ते यांचे काप किंवा मगज बी घालावे व त्याचे लाडू वळावेत. थंड झाले की हे लाडू घट्ट झाकणाच्या डब्यात भरून ठेवावेत.

वैशिष्टय:

बेसन भिजवताना डावाने पातळ धार लागेल इतपत सैलसर ठेवावे. बेसन भाजायला खूप वेळ लागतो. तसेंच ते कधी कमी जास्त भाजले जाते. म्हणून त्यासाठी हे अशा पद्धतीने बनवले तर हमखास छान होतातच. या लाडुची चव थोडीफार बुंदीच्या लाडूसारखी सुद्धा लागते. ते सुद्धा सर्वांना आवडतातच. म्हणून या प्रकाराने बनवले तर दोन्ही लाडूंची मजा चाखता येते. याचा रंग सुद्धा खूप सुरेख येतो. आणि बरेच दिवस छान राहतात. त्यामुळे प्रवासात किंवा सणावारी हे लाडू आवर्जून करावेत.पहिल्यांदाच बेसनाचे लाडू करणारे सुद्धा आता हे लाडू उत्तम बनवतील.

# तोकडे कपडे ही आपली संस्कृती नाही?

ज्योतिर्मय साहित्य

तोकडे कपडे वापरणं ही आपली संस्कृती नाही. एकेकाळात होती. जेव्हा माणूस माकडरुपात झाडावरुन खाली जमीनीवर राहायला आला होता. तो प्राण्यांचे कच्चे मांस खायचा. ते रानटी व पशुगत जीवन होतं व कपडे म्हणजे काय? ते त्याला समजत नव्हतं. मध्यंतरी काही जातीजमातीही तोकडे कपडे वापरायच्या. कारण त्यांना पुरेसे कपडे घ्यायला पैसेच मिळायचे नाहीत. विश्वकोटीचं दारिद्र्यच. तेही त्यांच्याच बिरादरीत राहायचे. त्यांची घरं वा अधिवास वेगळाच होता. तसंच तेही जनावरांचे कच्चे मांस खायचे. परंतु आज तसं नाही. समाज सुधारला आहे व समाजाला पुरेसे कपडे घ्यायला पैसे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. असे असतांनाही काही लोकं आजही तोकडे कपडे वापरतात. मोठमोठ्या रेस्टॉरेंटमध्ये जातात. दारु पितात. भाजलेलं मांस खातात, मदिरापान करतात व मादकतेनं कुणावरही बलात्कार करीत सुटतात. हे पशुगतच वागणं व वावरणं, फॅशनच्या नावाखाली. त्यांना काही म्हणताही येत नाही. म्हटलं तर स्वातंत्र्य आहे म्हणतात व स्वातंत्र्यावर आपण गदा आणत आहात. असंही म्हटलं जातं. परंतु अशांनी समाजात मिसळून समाजाला बदनाम करण्याऐवजी आपला वेगळा अधिवास करावा. जेणेकरुन भारतासारखी सुसंपन्न, सुसंस्कृत असलेली संस्कृती बदनाम होणार नाही.*



आपण भारत देशात राहतो व आपल्या भारताचा आपल्याला अभिमान आहे. तसंच जो भारतवाशी असेल व जो भारतात राहात असेल, त्या सर्वांना आपल्या देशाचा अभिमानच वाटत असेल. अशावेळेस आपल्या भारताला कोणी नावबोटं ठेवल्यास आपल्याला भयंकरच नाही तर महाभयंकरच राग येवू शकतो. याचं कारण आहे आपली संस्कृती. आपण भारताला आपल्या आईचा दर्जा दिलाय.

आपण भारत देशात राहतो व आपण सर्वजण भारत देशाचे नागरिक आहोत. आटल्या भारताचीही एक संस्कृती आहे. आपण आपली संस्कृती पवित्र मानतो. कारण आहे, आपली आई व आपल्या आईची शिकवण. आपली आई आपल्याला जन्म देते. ती जेव्हा जन्म देते. तेव्हापासूनच ती आपल्याला चांगल्या चांगल्या गोष्टी शिकवते. ती आपल्याला न्हाऊपिवू घालते व आपल्याला आपल्या पायावर उभं राहण्यापर्यंत सक्षम बनवते. अशातच आपली हळूहळू वाढ होते आणि आपल्याला असलेल्या मेंदूचीही हळूहळू वाढ होते. मग प्रगल्भ झालेला मेंदू विचार करायला लागतो. तोच मेंदू कालांतरानं काय वाईट व काय चांगलं. हे ओळखण्याची जाणीव जागृती देत असतं. अशावेळेस कोणी आपल्याला चांगलं म्हटलं तर आपल्यालाही चांगलं वाटत व कोणी वाईट म्हटल्यास आपल्यालाही वाईटच वाटतं.

आपली आई आपल्याला आवडते. असा जगात कोणीच नसेल की ज्याला आपली आई आवडत नाही. पशुपक्षांनाही त्याची आई आवडतेच. कारण ती आई आपल्या बाळाला दूध पाजते. त्याची काळजी घेते. त्यातच जर कोणी एखाद्या व्यक्तीनं आपल्या आईला शिव्या दिल्यास वा एखादा अपशब्द बोलल्यास आपल्याला राग येतो. एवढा राग येतो की आपण त्या व्यक्तीचा समाचार घेत असतांना त्याचा खुनही करावासा वाटतो आणि करुनही टाकतो. हे लहानपणी आणि मोठेपणीही निदर्शनास येतं. एवढं आपलं आईवरचं प्रेम. तसंच आपल्याला आपल्या भारताबद्दल वाटत असतं, कोणी काही अपशब्द बोलल्यास. आज मात्र काळ बदलला आहे व बदलत्या काळानुसार आपलं आईवरचं प्रेम अपण मोठे होताच कमी झालेलं आहे. कारण बऱ्याच जणांची आई आज वृद्धाश्रमात दिसते. प्रेम हे फक्त लहानपणीच दिसतं. मोठेपणी आपल्याला आपली आई पाहिजे त्या प्रमाणात चांगली वाटत नाही. म्हणूनच वृद्धाश्रम. असं असलं तरी आपण आपल्या आईबद्दल अपशब्दाचे बोल ऐकत नाही. मोठेही झालो असलो तरी आणि आपण आईला वृद्धाश्रमातही ठेवलं तरी. याचं कारण आहे, आपलं आईवरचं प्रेम. आपली आई आपल्यासाठी मातृदेवोभवं असतं. अर्थात देवी असते.

आपली आई. आपली आई आपल्याला आवडते एका देवीच्याच रुपात. ती देवी, जिला आपण पाहिलेलं नाही. सारे पोशाख तिला आपण आपल्या कल्पनेनं परिधान करुन दिले. आपल्याला देवी चित्रपटातून सापडली. जिच्या अंगावर सोळा शृंगार आहेत. ती तोकड्या कपड्यानं नटलेली नाही. चांगला भरजरी पोशाख तिच्या अंगावर आहे. इकडून तिकडून, आलटूनपालटून पाहिलं तरी तिचं कोणतंच नैतिक अंग खुलं दिसत नाही. ती देवी आहे व देवीला आपण तोकड्या कपड्यात पाहातच नाही. कारण ती आपली संस्कृती आहे. तशीच आपली आई. आपली आईही आपल्याला आवडते व आपल्याला ती व्याभिचारी कापडात आवडत नाही. ती आपल्याला बंद कापडातच आवडते. असा कोणताच भारतीय पुरुष नसेल की त्याला त्याची आई भरजरी पोशाखात आवडत नाही. प्रत्येक भारतीयांना आपली आईही चांगल्या पोशाखात आवडते. कारण तिही आपली एक संस्कृती. अन् ज्या देशात आपली आई राहाते आपल्याला घेवून. तो देश आपलाच आहे, भारत देश व त्याचीही अशीच संस्कृती आहे व तिही संस्कृती महानच आहे. मग ती संस्कृती आपण तोकड्या कपड्यात का ठेवावी? हा यक्षप्रश्न कोणालाही नक्कीच पडू शकतो. जो आपल्या आईला व आपल्या मातृभुमीला मानतो. तिचा तिरस्कार करीत नाही.




भारत आपला देश आहे व आपल्या भारताची संस्कृती महान आहे. अशा या भारतात आपल्या आईला देवीचा दर्जा आहे व आपली आई आपल्याला शालीन पोशाखात आवडते. तसंच आपल्या मातृभुमीचंही असावं आणि आहेच. तसं विदेशात नाही. विदेशात मुल हे दहा वर्षाचं झालं की त्यांचे आईवडील त्याला सोडून देतात. कशासाठी तर आत्मनिर्भर करण्यासाठी. ज्याप्रमाणे पशूपक्षी हे बाळाला जन्म देतात व सोडून देतात, ती थोडीशी मोठी झाली तर....... तसंच आहे विदेशी लोकांचं. कारण तेथील संस्कृती तशीच आहे. पशुगत जीवनासारखी. त्याचं कारण म्हणजे तेथील हवामान, परिस्थिती व वातावरण.

विदेशातील वातावरण हे दमट आहे व तेथील वातावरण दमट असल्यानं अंगावर कोणतेच कपडे सहन होत नाहीत. शिवाय वातावरण दमट असल्यानं कपडे वेळोवेळी फाटतातच. ते कपडे कमी वेळात फाटत असल्यानं नवीन कपडे वारंवार घेता येत नाही. त्यामुळंच त्यांना कपडे फाटकेच परिधान करावे लागतात. घेवून घेवून कितीवेळेस घेणार कपडे. **(क्रमशः)**




# लेखमाला : चिन्हांच्या गर्दीत हरवणारे शब्द

ज्योतिर्मय साहित्य

या संपूर्ण विवेचनाचा केंद्रबिंदू एकच आहे, शब्द आणि स्मरणशक्ती यांचा निकटचा संबंध. आपला मेंदू हा अत्यंत प्रामाणिक, कार्यक्षम आणि आज्ञाधारक सेवक आहे. आपण त्याला ज्या प्रकारचा सराव देतो, त्याच दिशेने तो स्वतःला घडवतो. जी कृती आपण वारंवार करतो, तिलाच तो महत्त्वाची समजतो. जी गोष्ट आपण क्वचित करतो, ती दुय्यम ठरवतो. शब्दांबाबतही हेच घडते.

एखादा शब्द वारंवार बोलला, लिहिला आणि वाचला गेला, तर तो स्मरणात दृढ होतो. त्याच शब्दाचा वापर वर्षानुवर्षे झाला नाही, तर तो हळूहळू निष्क्रिय होतो. नंतर तो आठवण्यासाठी प्रयत्न करावा लागतो आणि शेवटी तो पूर्णपणे विस्मरणात जाऊ शकतो.

आज डिजिटल संवादात आपण अनेक भावना एका चिन्हातून व्यक्त करतो. त्यामुळे शब्द शोधण्याची, योग्य शब्द निवडण्याची आणि वाक्य तयार करण्याची गरज कमी होत जाते. परिणामी मेंदूचा भाषिक व्यायामही कमी होतो, म्हणजे एका अर्थाने आपण आपल्या मेंदूला आळशी बनवतो..

विचार करण्याची प्रक्रियाही शब्दांवरच आधारलेली असते. समृद्ध शब्दसंग्रह म्हणजे समृद्ध विचारविश्व. शब्द जितके सूक्ष्म, तितकी विचार करण्याची क्षमता व्यापक. म्हणून शब्दांचा वापर हा केवळ भाषिक सवय नसून बौद्धिक शिस्त आहे.

जगभर लोक कहास करून ५० च्या पुढे वय असणारे स्मृतीभ्रंश (डीमेंशिया) या रोगाने ग्रस्त आहेत. त्यातून पुढे ओत रोग बळावलयास अल्झायमार हा भयंकर रोग होऊ शकतो. तो टाळायास असेल तर आपल्याला भाषेचा अधिकाधिक उपयोग करायला हवा. सारखे एकांतात बसण्यापेक्षा चारचौघात मिसळावे व त्यांच्शी मनमोकळे बोलावे. घारात सुद्धा सर्वांशी बोलावे. आपण जितके जास्त बोलू, तितके आपले शब्द स्मरणात राहतील.

म्हणूनच आपण एक छोटा संकल्प करू या.

''जिथे शक्य असेल, तिथे मी चिन्हांपेक्षा शब्दांना प्राधान्य देईन.'' हा संकल्प केवळ भाषेला नव्हे, तर आपल्या स्मरणशक्तीलाही बळ देणारा ठरेल.

(क्रमशः अंतिम भाग)

शब्दसंख्या २५७

# निसर्गवैभवातून होणारा आनंदोत्सव ''जंगल सफारी''

ज्योतिर्मय साहित्य

बालमन फार निरागस असतं. त्यांचं जग अद्भुतरम्य असते. त्यांच्या कल्पनाशक्तीला कोणतीही बंधने नसतात. बालमन तितकेच संवेदनशील आणि धैर्यशीलसुद्धा असते. म्हणूनच कोणतेही बालसाहित्य बालकांच्या कुतूहलबुद्धीला आणि जिज्ञासेला पूरक असणारे असावे. आजच्या यांत्रिक युगात बालमनाच्या अंतर्मनाचा सखोल अभ्यास करणाऱ्या, त्यांची मानसिकता जपणाऱ्या, बालकांच्या भावनिक, बौद्धिक, कल्पनाशक्तीचा सर्वांगीण विचार करणाऱ्या सर्वांच्या परिचित असलेल्या प्रगल्भ लेखिका. ॲड. नीता कचवे यांनी जंगल सफारी हा अतिशय सोप्या भाषेतील, बालकांना हवाहवासा वाटणारा बालकवितासंग्रह नुकताच प्रकाशित केलेला आहे.

कवियित्री जंगल सफारी तून बालदोस्तांना बालकवितेच्या दुनियेत नेतांना बालमन शब्दांच्या प्रेरणात्मक मांडणीतून जपतांना जाणवते.

जंगल सफारीहातात घेतल्यावर बालकांना काव्य वाचनासोबतच चित्रांची भाषा सहज समजेल असे काहीसे काल्पनिक चित्रे कवियित्रीने प्रत्येक कवितेच्या पानांवर सजवलेले आहेत... बालकांना हवाहवासा असणारा हा संग्रह आहे.

जंगल सफारीचे पहिले पान संवाद च्या माध्यमातून कवी गणेश शिवराम भाकरे यांनी बालकांना विशेष शुभेच्छा देऊन बालमन जपलेले दिसून येते. त्यांनी बालकांना पर्यावरणाविषयी असलेली जाणीव, मैत्रीतून जपलेले क्षण, सुंदर संस्कार, निसर्गवैभवातून होणारा आनंदोत्सव जंगल सफारीच्या माध्यमातून सांगितलेला आहे.

प्रा. अलका गायकवाड यांच्या बालकांना शुभेच्छा देतांना बालमनाच्या संवेदनशीलतेची जाणीव ठेऊन बालकांच्या भावविश्वाला समृद्ध केलेले आहे...

बालकांसोबत हितगुजच्या पानावर कवियित्री नीता यांनी अंतर्मनातील मनोगत व्यक्त केलेले आहे..ते वाचून बालकांचे मन नक्कीच सुखावून जाणार . कारण कवियित्री या सामाजिक विविधता अभ्यासणाऱ्या प्रगल्भ लेखिका आहेत. कल्पनेतून वास्तविकता शोधून प्रेरणात्मक लिखाण करणारी....एक सखोल अभ्यासक म्हणजेच ॲड. नीता कचवे......


बालकवितासंग्रह अनुक्रमे बघतांना अगदी दक्षता राखून कवियित्रीचा बालकवितेतून भावनिक, बौद्धिक, कल्पनाशक्तीचा विचार करून ..सहज सोप्या चित्रमय भाषेतून मुलांचा शब्दसंग्रह वाढण्याचा दृष्टिकोन कवियित्रीच्या बालकवितेतून लक्ष्यात येतो ....

आनंदाचे पंचतंत्र प्रमाणे ...जंगल सफारीतून बालकांना नितिमूल्ये शिकवणारे सूत्र सहजतेने जणू वाचनाची ओढ निर्माण करणारे आहे.

कवियित्री नीता यांनी बालकांच्या बौद्धिकक्षमतेनुसार पहिलीच कविता सावित्रीमाई मुलांना सहज उमजेल अशा साध्या भाषेत रेखाटली आहे.

पहिली ती शिक्षिका...
सरस्वती समान....
तिच्यामुळे मिळाला....
ज्ञानाचा सन्मान....


या संपूर्ण कवितेतून सावित्रीमाईचं संपूर्ण अस्तित्व (अर्थातच क्रांतिज्योती प्रेरणास्थान) बालकांना सहज समजणार... पुस्तकांची पाने पलटवतांना बालकांना नक्कीच जंगल सफारी साक्षात अनुभवाचा भास होणार हे नक्की... कारण प्रत्येक पानांवर रचलेल्या कवितेसोबत सुरेख चित्रांगण आहे. यावरून मुलं त्यांच्या कल्पनाशक्तीने नक्कीच चित्रे रंगवतील.. यामुळे आपल्याला कवियित्रीने जपलेले बालमन सहज लक्षात येते.




हत्तीबाप्पा, हरीण, खारुताई, ससेराव आणि बालकांपासून तर आई-बाबांना गुणगुणायला लावणारी चला जाऊ आपण जंगल सफारीला...

हिरव्या झाडांच्या थंडगार सावलीला..... या बाल कवितेतून आपल्या कवियित्रीने जणू प्रत्येक ओळीतून बालकांच्या लोभस मनाचा विचार करून जंगल सफारी करून आणलेली जाणवते.

जंगलाचा राजा, अजब खवले मांजर, जिराफ, माकड, मोर, मगर, झेब्रा, कासव, झाडी, डोंगर, नदी, निसर्गसखा ओढा, तलाव, बेडूक, अस्वलाची गंमत, धूर्त कोल्हा,लांडगा, जंगलातील पक्षी, डोंगराची राणी, जादूगार सरडा, पोपट, रानफुले, पावसाचे थेंब, जंगलातील गुपित,... सरपटणारा साप, चपळ बिबट्या, कांगारू, जंगलातील धबधबा,-खजिना, झाडोबाचे लाकूड, शेकरू, झाडावरचा राजा, ब्लू मार्मन, जांभळे जारूल फूल, वाघूर मासा, राज्य वृक्ष, तलावातील कमळ, मधमाशा, जंगलाची हाक, सफारीचा थरार, जंगलाचे बदलणारे रंग, जंगलातील गप्पागोष्टी, जंगलाचा नियम आणि जंगल सफारी अशा एकूण एक्कावन बालकवितेतून प्रत्येक प्राणी, पक्षी, हिरवेगार जंगल यांची महत्वाच्या माहितीसोबतच कवियित्रीने शब्दाशब्दातून पर्यावरण जपलेले लक्ष्यात येते...




जंगलाची हाक या कवितेतून जणू बालमनासोबत आपल्यालाही ती हाक ऐकू येते.. हा भास होतोय...

निसर्गराजा देतोय हाक, ऐका कान देऊन.....

जंगल वाचवू आपण, एक एक झाड लावून....

विचार करायला भाग पाडणाऱ्या रचना या बालमन जपणाऱ्या कवियित्रीने काव्य शब्दातून मनोमन सृष्टि जपली आहे.

वृक्षारोपण करून निसर्गाचे जतन करू

मानवी जीवनात आपण सुख समृद्धी वाढवू .....झाड या कवितेतून कवियित्री बालकांना निसर्गदेणगीचे महत्व पटवून देत आहे.

मखमली काळ्या पंखावर निळा साज....

फुलपाखरांच्या जगात याचेच राज... महाराष्ट्राचे हे राज्य फ ुलपाखरू....

चला याच्याशी मैत्री आपण करू....

बघा....साध्या ओळीमधून कवियित्री बालकांना सहज ज्ञान देऊन जाते.

प्रत्येक पानावरील कविता बालमनाला आनंद आणि प्रत्येक कवितेच्या ओळीतून ज्ञान देणारी आहे. मधमाशा मधील कवियित्रीच्या ओळी मुलांना एकजुटीने राहण्याचं सूत्र सांगते.

एकीने त्या काम करती, भांडण त्यांच्यात नाही,
शिस्तबद्ध त्यांच्या त्यांच्या जीवनाची,
सर कुणालाच नाही....

सफारीचा थरार या कवितेतून कवियित्री जिप्सीतून केलेला निसर्गातील बोलका प्रवास सांगू इच्छिते.

जंगलाशी संवाद साधता...
जुळले निसर्गाशी बंध....
घराकडे निघालो आम्ही...
मनात साठवून आनंद....

आहे ना मुलांनो गंम्मत...या जंगलातील निसर्गरम्य हिरवी झाडे म्हणूनच जपायची, हा निसर्गराजा आपल्याला जगवतोय. चिऊ -काऊसारखे असंख्य पक्षी या निसर्गामुळे सुरक्षित राहतात.अवघे रान स्वर्ग होण्यासाठी माणसांनी वृक्षतोड थांबवावी...नव्याने वृक्षारोपण करून जंगल सुरक्षित ठेवावे. हा प्रबोधनात्मक संदेश आपल्या कवियित्री देत आहेत...

जंगल सफारी तील प्रत्येक कविता गेयता, लयबद्ध, नादमधुर म्हणजेच मुलांसोबत पालक देखील वाचतांना सहज गुणगुणत राहील अशा आहेत... म्हणूनच या कविता काही प्रसिद्ध बालकवीची आठवण करून देतात.

आपण वाचलेले आवडते काही दिग्गज कविवर्य यावेळी आपल्याला आठवतात.... बाल्यमन जाणकार कविवर्य राजा मंगळवेढेकर(आपल्या बालपणी आपल्यात रुजलेलं गीत,असावा सुंदर चॉकलेटचा बंगला), विंदा करंदीकर, राजीव तांबे, वसंत कानेटकर, आचार्य अत्रे, कुसुमाग्रज,साने गुरुजी यांचे बालसाहित्य आणि आता जंगल सफारी बालकांच्या भावविश्वाला समजून मनोरंजन सोबतच अत्यंत रंजक आणि संस्कारक्षम या दर्जे दार, सुंदर बालसंग्रहाची ॲड. नीता कचवे यांनी निर्मिती केली.

या संग्रहातील शेवटचे पान फार प्रभावशाली आहे... आपल्या कवियित्रीचा वैभवी परिचय वाचतांना त्यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य बघता त्यांच्या अस्तित्वाचा मनोमन अभिमान वाटतो....

जंगल सफारीचे शेवटचे कव्हरपेज..... आपले जिल्हा शिक्षणाधिकारी सन्माननीय श्री. प्रफ ुल्ल माधवराव कचवे यांनी अतिशय कर्तव्यदक्षतेने पाठराखण केलेली जाणवते.बालमनाचे संस्कारविश्व पटवून देतांना ते म्हणतात... ''आजच्या यांत्रिक आणि मोबाईलच्या पडद्यामागे हरवत चाललेल्या बालमनाला जंगल सफारीया बालकवितासंग्रहातून नव्याने निसर्गाच्या सानिध्यात नेता येईल... निसर्गप्रेमाची बीजे पेरणारा हा संग्रह बालसाहित्यात निश्चितच आपले वेगळे स्थान निर्माण करेल.''.. अगदी खरंय.....संस्काराची अविस्मरणीय सफर घडवणारा हा शब्दोत्सव आहे....

हा बालकविता संग्रह प्रत्येक घराघरात छोट्या बालकांना फार आवडणार ... ही खात्री आहे.

माझी सखी ॲड. नीता यांचे प्रकाशनाच्या वाटेवर असणाऱ्या प्रत्येक साहित्यकृतीला माझ्या अखंड यशदायी शुभेच्छा..

जंगल सफारी...
बालकविता संग्रह..
कवियित्री... ॲड.नीता कचवे.
मो. ८८०५२५८०१६..
मुखपृष्ठ :-उद्धव शहाणे